ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ | पुणें, बुधवार तारीख १२ डिसेंबर, १९५१ | अंक ४७

## विविध माहिती

**रेल्वेचीं तिकिटें देणारीं यंत्रें**—कलकत्त्याजवळील सेल्दा स्टेशनवर तिसऱ्या वर्गाचीं रेल्वेचीं तिकिटें देणारीं विजेचीं यंत्रें ता. ३० नोव्हेंबरपासून बसविण्यांत आलीं आहेत. तूर्त ह्या यंत्रांची संख्या आठच आहे. तिकिटें देण्याच्या कामांत ह्या यंत्रांमुळें बरीच बचत होत आहे, असें समजतें.

**हिंदी लष्करार्चे वृक्षारोपण**—१९४९ च्या एप्रिलपासून भारतांत वृक्षसंवर्धनाची मोहीम सुरू झाली. तेव्हांपासून भारतीय सरकारच्या लष्करानें ५,००,००० झाडें लावलीं. ता. ७ जुलै, १९५१ दिवशीं लष्करानें वनमहोत्सव-दिन साजरा केला, त्यावेळीं आणखी ८३,४२६ झाडें लावण्यांत आलीं.

**एअर इंडिया इंटर-नॅशनल कंपनी**—भारतामधील वैमानिक वहातुक करणारी ही सर्वांत मोठी कंपनी आहे. कंपनी कॅलिफोर्निआंतील लॉकहीड एअरक्रॅफ्ट कॉर्पोरेशनकडून दोन कॉन्स्टेलेशन जातीचीं नवीन विमानें विकत घेणार आहे असें समजतें. दोन्ही विमानांना मिळून ३०,००,००० डॉलर्स किंमत द्यावी लागेल. इतर गोष्टींत जमलें तर हीं विमानें १९५२ सालीं कंपनीच्या स्वाधीन करण्यांत येतील.

**अन्नसत्त्वाची देणगी**—पेस्टालाझी फौंडेशन ऑफ अमेरिका ह्या संस्थेकडून अन्नसत्त्वाच्या ११५ पौंड वजनाच्या कॅपसूल्स भारतीय सरकारला देणगीदाखल मिळणार आहेत. ह्या अन्नसत्त्वाची किंमत सुमारें ५,००० डॉलर्स होईल. भारतामधील दुष्काळी भागांत हें अन्नसत्त्व वाटण्यांत येणार आहे. भारतीय सरकारनें देणगीचा स्वीकार केला आहे.

**बटाट्याच्या लागवडीचें क्षेत्रफळ**—चालू वर्षी भारतांत बटाट्याच्या पिकाखालीं ५,८८,००० एकर जमीन असावी. पीक अंदाजें १६,२९,००० टन येईल असें समजतें. गेल्या वर्षीचे हे आंकडे अनुक्रमें ५,७७,००० एकर व १५,१९,००० टन असे होते. ह्यावरून क्षेत्रफळांत १·९ टक्के आणि पिकांत ७·२ टक्के वाढ झाली, असें दिसून येतें.

**इंडोनेशिआमधील चहाचे मळे**—इंडोनेशियामधील चहाच्या मळ्यावरील मजुरांची मजुरी व इतर वस्तू ह्यांच्या किंमतींत फार वाढ झाल्यामुळें बरेच मळेवाले मळे बंद करण्याच्या विचारांत आहेत असें समजतें. त्यांना सरकारी मदत मिळाली नाहीं तर कठीण प्रसंग ओढवणार आहे. १० मळेवाल्यांनीं आपलीं कामें आतांच थांबविलीं आहेत.

**वीज निर्माण करण्याचा सहकारी प्रयत्न**—श्रीनगरपासून जवळच असलेल्या बंदीपूर ह्या गांवीं पाण्यावर वीज उत्पन्न करणाऱ्या सहकारी कारखान्याचें नुकतेंच उद्घाटन करण्यांत आलें. वीज सहकारी तत्त्वावर उत्पन्न करणारा हा कारखाना भारतामधील पहिलाच असावा, असें म्हणतात.

**हैदराबाद संस्थानांत तांब्याच्या खाणी**—हैदराबाद संस्थानमधील कोठागुडेम कोळशाच्या खाणीजवळ तांब्याच्या खाणी सांपडल्याचें वृत्त आहे. निझाम स्टेट रेल्वेवरील दोर्नाकल, भद्राचलम् भागावर ही खाणीची जागा आहे. हैदराबाद संस्थानांत कोळसा, सोनें आणि अभ्रक हीं सांपडतात.

**हैदराबाद सरकारला कर्ज**—हैदराबादच्या निजामशहांनीं संस्थानमधील मोठमोठ्या कामांसाठी सरकारला १६ कोटी रुपये कर्जाऊ दिले आहेत असें समजतें. त्याशिवाय भारत सरकारच्या कर्जरोख्यांतहि त्यांनीं ३० ते ४० कोटी रुपयांची रक्कम गुंतविल्याची बातमी आहे.

**मुंबईमधील तेलाचा कारखाना**—स्टँडर्ड व्हॅक्यूम ऑईल कंपनीतर्फे मुंबईत निघणाऱ्या तेल-शुद्धीच्या कारखान्यांतून रोज सुमारें १९,००० पिंपें तेलाचें उत्पादन होऊं शकेल. प्रत्यक्ष उत्पादनास १९५६ मध्यें प्रारंभ होईल. इराणमधून अशुद्ध तेल आयात करून त्याचें शुद्धीकरण कारखान्यांत करण्यांत येणार आहे.

**डाव्या हातानें चेक लिहिणाऱ्यांसाठी**—डाव्या हातानें लिहिणाऱ्या लोकांची सोय करण्याच्या हेतूनें वेगळीं चेकचीं पुस्तकें छापण्याचा उपक्रम अमेरिकन बँकांनीं सुरू केला आहे. लोकांनीं देण्याघेण्याचे व्यवहार चेकनीं करावे म्हणून अमेरिकन बँकांनीं गेलीं तीस वर्षें मोहीम चालविली होती. वरील सोय त्याच मोहिमेचा एक भाग आहे. आतां अमेरिकेमधील व्यापारी व्यवहारांपैकी ९० टक्के व्यवहार चेक्सनें पार पाडले जातात. दरवर्षी सुमारें ६०० कोटी चेक्स अमेरिकेंत छापले जातात.

**कृत्रिम रबराची निर्यात**—अमेरिकेमध्यें निर्माण करण्यांत येणाऱ्या कृत्रिम रबरापैकीं कांहीं भाग अमेरिका पुढील वर्षी आपल्या दोस्त राष्ट्रांकडे निर्यात करील अशी अपेक्षा आहे. १९५२ च्या पहिल्या तिमाहींत करण्यांत येणारी रबराची निर्यात मात्र बेताचीच आहे. अमेरिकेंतील किंमती आणि निर्यातीच्या किंमती ह्यामध्यें फरक रहाणार नाहीं.

## मॉरिस-ऑस्टिन एकत्रीकरणाची योजना

मॉरिस मोटर्स लि. आणि ऑस्टिन मोटार्स लि. ह्या दोन कंपन्या एकत्र होत आहेत. ह्या कंपन्यांच्या एकत्रीकरणाच्या इष्टतेबद्दल दोन्ही कंपन्यांच्या डायरेक्टरबोर्डांचा विचार कांहीं काळ चालू होता. एकसूत्री नियंत्रणामुळें उत्पादन अधिक कार्यक्षमतेनें व स्वस्त होईल आणि परदेशांत त्यांचें उत्पादन व मागांची जुळणी ज्यास्त फायदेशीर होईल हें त्यांना पटलें. एकत्रीकरण राष्ट्राच्या आणि भागीदारांच्या वैयक्तिक हिताचें होईल, असेंहि त्यांचें मत झालें. म्हणून त्यांनीं खालीलप्रमाणें एकत्रीकरणाची योजना आखली आहे:—

५० लक्ष पौंड अधिकृत भांडवलाची एक होल्डिंग कंपनी केली जाईल, तिचें भांडवल प्रत्येकीं ५ शिलिंगांच्या २ कोटी ऑर्डिनरी भागांत विभागण्यांत येईल. सध्याच्या दोन्ही कंपन्यांच्या भागीदारांना त्यांच्या प्रत्येक ५ शिलिंगाच्या भागास होल्डिंग कंपनीचा एक भाग दिला जाईल, आणि ही योजना पुरी झाली म्हणजे होल्डिंग कंपनींतील १,०६,००,००० भाग मॉरिस कंपनीच्या भागीदारांना मिळतील व ७९,५५,४३७ भाग ऑस्टिन कंपनीच्या भागीदारांना मिळतील. दोन्ही कंपन्यांच्या प्रेफरन्स व डिफर्ड ऑर्डिनरी भागांस असलेलें भांडवल व डिव्हिडंड ह्याबाबतचे अधिकार होल्डिंग कंपनींतहि कायम राखले जातील. कायद्यानें आवश्यक त्या गोष्टी पुऱ्या झाल्यावर दोन्हीं कंपन्यांच्या भागीदारांच्याकडे तपशीलवार पत्र जाईल. दोन्ही मोटार कंपन्यांपैकीं प्रत्येकीच्या ९०% भागीदारांनीं आपले भाग बदलून घेण्यास संमति दिली आणि लंडनच्या स्टॉक एक्सचेंजनें होल्डिंग कंपनीच्या भागांच्या खरेदी–विक्रीस परवानगी देऊन तिला 'मार्केट कोटेशन' दिलें, तरच ही योजना पार पाडली जाईल.

## टाटांच्या संघटनांस भांडवलशाही कोण म्हणेल ?

"टाटांच्या नांवानें चालू असलेल्या फर्म्सच्या भांडवलापैकीं ८० टक्के भांडवल टाटांच्या वेगवेगळ्या धर्मादाय ट्रस्ट्सच्या मालकीचें आहे. त्यामुळें फर्मनें मिळविलेला नफा आपोआपच निरनिराळ्या ट्रस्ट्सच्या वाट्यास जातो आणि तो लोककल्याणाच्या कार्यावर खर्च होतो. ह्याला कोणी भांडवलशाही म्हटलें, तर भांडवलशाहीचें जें भडक चित्र रंगविलें जातें त्यापेक्षां ही अगदीं वेगळी आहे. टाटांच्या उपक्रमांची आपण छाननी केली, तर त्यांतील दोन महत्त्वाच्या गोष्टींमुळें सामान्य लोकांच्या समजुतीमधील भांडवलशाहींत टाटांची संघटना बसूच शकणार नाहीं:— (१) ज्या औद्योगिक क्षेत्रांत दुसरा कोणी प्रवेश केला नाहीं, अशा कित्येक क्षेत्रांत टाटांनीं आघाडीचें प्राथमिक काम अनेक धोके पत्करून केलें; त्यांपैकीं कोणत्याहि उपक्रमांत त्यांना सोप्या मार्गानें किंवा तातडीनें पैसे मिळण्याचा यत्किंचितहि संभव नव्हता. (२) त्यांनीं ज्या पद्धतीनें कामाची घडी बसविली, त्या पद्धतीनें आपोआपच नफा राष्ट्रीय सेवेकडे वहाण्याची व्यवस्था लागली. टाटांनीं वाढविलेल्या प्रचंड उद्योगांचें राष्ट्रीयीकरण करण्यांत आलें, तरी त्यासंबंधांत टाटांनीं बजावलेल्या कामगिरीबद्दल टाटांच्या फर्मला समाधान व अभिमानच वाटेल. अत्यंत मौल्यवान अशी राष्ट्रीय महत्त्वाची जिंदगी निर्माण करण्यांत हातभार लावल्याचा सात्विक आनंद टाटांना होत राहील. टाटांच्या नेतृत्वाखाली काम करीत असलेल्या माणसांत देशांतील सर्व प्रकारच्या मतप्रणालींचे लोक आढळतील. लोकशाही यशस्वी होण्यासाठी आवश्यक तें परस्पर प्रीतीचें व समजूतदार पुढारीपणाचे गुण टाटांच्या संघटनांतून भिनविण्याचा प्रयत्न एकसारखा चालू असतो." :—सर दोराबजी टाटा ट्रस्टचे अध्यक्ष, डॉ. जॉन मथाई.


सहकार्य, ऐक्य, चिकाटी व दीर्घोद्योग यांचे जोरावर शेतकऱ्यांनीं उभारलेली व शेतकऱ्यांच्याच पूर्ण मालकीची, व शेतकऱ्यांनींच चालविलेली, अखिल भारतांतील एकच आदर्श साखर संस्था—

# दि सासवड माळी शुगर फॅक्टरी, लि.

**माळीनगर, जिल्हा सोलापूर.**

(पंढरपुरी पवित्र साखरेचे निर्माते)

| स्थापना | अधिकृत भांडवल | वसूल भांडवल |
|---|---|---|
| १९३२ | रुपये एकावन्न लाख | रु. ३४,५८,०००. |

**हा कारखाना शेतकऱ्यांनीच स्वतःचे भांडवलावर उभारून स्वतःच चालविला आहे. सर्व बागायतदार पिढीजात, जातिवंत शेतकरी असल्यानें अखिल भारतांत ऊंस उत्पादनाचा त्यांनीं उच्चांक गाठला आहे.**

सुरवातीस साखरेची मशिनरी दररोज १५० टन ऊंस गाळणें इतकी होती. ती वाढवून आतां ५५० टन झाली आहे. पुढील सीझनपासून कारखान्याची कार्यक्षमता वाढवून दररोज ७५०।८०० टन ऊंस गाळण्याकरितां कारखान्यांत अद्यावत इलेक्ट्रिक यंत्रसामुग्री बसविण्याचें बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांनीं योजलें आहे व त्याकरितां जरूर ती यंत्रसामुग्री परदेशांतून मागविली आहे. यामुळें पुढील सीझनमध्यें या आधुनिक व सुसज्ज कारखान्यांतून निघालेली पांढरीशुभ्र दाणेदार साखर आपणांस वापरणेस मिळेल.

ह. व. गिरमे,
मॅनेजिंग डायरेक्टर,
दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि.
पोस्ट माळीनगर, जि. सोलापूर.

# अर्थ

बुधवार, ता. १२ डिसेंबर, १९५१



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## धान्याच्या वाढवून दिलेल्या किंमती

भारतांतील पांच राज्यांत धान्याच्या लेव्हीची किंमत वाढवून द्यावी लागली, त्याचें कारण कित्येक ठिकाणीं पाऊस कमी झाल्यानें दुष्काळीं चिन्हें दिसूं लागलीं हें होय. उत्तर प्रदेश आणि पंजाब येथें फेब्रुवारी अखेर पर्यंत ही वाढ अंमलांत रहावयाची आहे. उत्तर प्रदेशांतील बाजरीची किंमत मणास ९ रु. ची ११ रु. करण्यांत आली आहे, तर पंजाबांत मक्याची किंमत मणास ८ रु. ४ आ. ची १० रु. ८ आ. आतां झाली आहे. पश्चिम बंगालमध्येंहि तांदळाची दर मणी किंमत १२ रु. १२ आ. ची १४ रु. ४ आ. करावी लागली आहे. बिहारमधील तांदळाची किंमत १३ रु. ४ आ. वरून १५ रु. ४ आ. वर नेण्यांत आली आहे.

धान्याचें उत्पादन कमी झालें म्हणजे धान्याची सरकारी वसुली कमी होणें क्रमप्राप्तच आहे. परंतु किंमती वाढविल्या म्हणजे नसलेलें धान्य कांहीं सरकारास मिळूं शकणार नाहीं. म्हणजे, कांहीं धान्याचा साठा केला जात असला पाहिजे आणि सरकारच्या सक्तीच्या धान्य वसुलीच्या योजनेस किंमतीचें आकर्षण आवश्यक ठरतें, अशी अप्रत्यक्ष कबुली आतां दिली जात आहे. सरकारी धान्यवसुली कार्यक्षम नाहीं म्हणूनच परदेशी एवढा पैसा खर्च करून धान्य आयात करावें लागतें, ह्या टीकेस सरकारच्या नव्या धान्य किंमतीनें पाठिंबाच दिला आहे. आतां किंमती वाढवून दिल्या, त्यामुळें पुढील वर्षाच्या उत्पादनास प्रोत्साहन मिळेल, असें म्हटलें तर गोष्ट वेगळी. कारण, आतांच्या वाढत्या किंमतीमुळें नवीन धान्य निर्मिति तात्काळ होणें अशक्य आहे.

लेव्हीच्या धान्याची किंमत वाढली, त्याचें तात्कालिक कारण पाऊस दरसाल प्रमाणें पडला नाहीं, हें आहे. हा पाऊस कोठें व किती कमी पडला, ह्याची नीटशी कल्पना येण्यास खालील माहितीचा व तक्त्याचा उपयोग होईल.

पाऊस सर्वत्र कमी पडल्यामुळें भारतांत कित्येक ठिकाणीं दुष्काळाचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. पाऊस कमी पडण्याचें मुख्य कारण नैऋत्य मानसूनचा पाऊस नेहेमींपेक्षां लवकर बंद झाला, हें होय. १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर ह्या मुदतींत हा मानसूनचा पाऊस बंद होतो. चालू वर्षी ३१ सप्टेंबरपूर्वींच तो बंद झाला. ऑक्टोबर व नोव्हेंबरमध्यें नंतर थोडासा पाऊस पडला, त्यामुळें परिस्थितीचा बिकटपणा थोडा कमी झाला आहे.

विंध्य प्रदेश, बंगालच्या उपसागरांतील बेटें, ओरिसा, कोंकण, द. हैद्राबाद व म्हैसूर ह्या प्रदेशांतच फक्त १% ते ९% पाऊस ज्यास्त पडला. देशावर व आंध्र देशाचा किनारा येथें नेहेमींइतका पाऊस झाला. इतर ठिकाणीं मात्र पाऊस कमी पडला. पंजाबांत म्हणजे गव्हाच्या आगरांत पावसाची ५१% कमतरता झाली. मुंबई राज्यांतील धान्यसमृद्धीच्या गुजरातमध्यें नेहमीं पडतो त्याच्या निम्माहि पाऊस पडला नाहीं. पू. उत्तर प्रदेश, बिहार आणि प. मध्य प्रदेश ह्या भाताच्या प्रदेशांतहि पावसाची बरीच तूट भासली. त्या तुटीचें प्रमाण अनुक्रमें ३५%, २५% व २२% होतें.

### १ जून ते ३१ ऑक्टोबर ह्या मुदतींत पाऊस शतमानानें नॉर्मलपेक्षां किती कमी–जास्त झाला, त्याचा तक्ता

| नॉर्मल पाऊस पडलेले प्रदेश | नॉर्मलपेक्षां जास्त पाऊस पडलेले प्रदेश | | नॉर्मलपेक्षां कमी पाऊस झालेले प्रदेश | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १०% पेक्षां कमी | | १० ते २५% | | २५ ते ५०% | | ५०% पेक्षां जास्त | |
| नांव | नांव | जास्त पडलेला पाऊस % | नांव | कमी पडलेला पाऊस % | नांव | कमी पडलेला पाऊस % | नांव | कमी पडलेला पाऊस % | नांव | कमी पडलेला पाऊस % |
| देश (डेक्कन) | विंध्य प्रदेश | +६ | पूर्व मध्य प्रदेश | −९ | प. उत्तर प्रदेश | −१७ | पू. उत्तर | | पंजाब | −५१ |
| आंध्र देश | बं. उपसागरां- | | हिमालया- | | प. राजस्थान | −२१ | प्रदेश | −३५ | गुजरात | −५५ |
| | तील बेटें | +५ | खालील प. | | प. मध्य प्रदेश | −२२ | पू. राजस्थान | −४८ | | |
| | ओरिसा | +१ | बंगाल | −४ | छोटा नागपुर | −१६ | मध्य भारत | | | |
| | कोंकण | +५ | गंगेच्या | | बिहार | −२५ | (भोपाळ | | | |
| | द. हैद्राबाद | +९ | खोऱ्यांतील | | आसाम | −११ | धरून) | −४३ | | |
| | म्हैसूर | +७ | प. बंगाल | −९ | रायल सीमा | −२० | सौराष्ट्र व | | | |
| | | | उत्तर हैद्राबाद | −८ | मलबार व | | कच्छ | −२७ | | |
| | | | त्रावणकोर– | | द. कानडा | −११ | तामीळनाड | −३५ | | |
| | | | कोचीन | −२ | | | | | | |

## भारतांतील आंकडेवारीविषयक संघटना

भारत सरकारनें गेल्या कांहीं वर्षांत आंकडेवारी गोळा करण्यासाठीं अनेक संघटना सुरू केल्या असून त्यांचे जोडीस या सर्वांची सांगड घालणारी एक संघटना मध्यवर्ती मंत्रिमंडळाच्या कार्यालयांत स्थापिली आहे. ही संस्था मंत्रिमंडळाच्या आंकडेवारी विषयक सल्लागाराचे अधिपत्याखालीं असून सध्यां प्रा. पी. सी. महालनोबिस तें काम निर्वेतन करीत आहेत. या मध्यवर्ती आंकडेवारी संघटनेचीं मुख्य कामें पुढीलप्रमाणें आहेत.

(१) भारत सरकारचीं निरनिराळीं खातीं व इतर सरकारी संस्थांस आंकडेवारीविषयक बाबींवर सल्ला देणें व आंकडेविषयक प्रश्नांवर निरनिराळ्या खात्यांच्या चर्चा घडवून आणणें.

(२) कामाची अनावश्यक द्विरुक्ती टाळण्याकरितां व त्यांहींशी करण्यासाठी तसेंच एकूण खर्च शक्य तितको कमी करण्याकरितां निरनिराळीं खातीं व इतर सरकारी संस्थांच्या आंकडेवारीविषयक कामाची सांगड घालणें.

(३) राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय तुलनीयतेंत सुधारणा करण्यासाठी व्याख्या व प्रमाणकें यांत सुधारणा करणें.

(४) सरकारला आवश्यक अशा माहितीच्या दर्जांत सुधारणा करण्याकडे सतत लक्ष देणें.

मध्यवर्ती आंकडेवारी संघटना ॲन्युअल स्टॅटेस्टिकल ॲबस्ट्रॅक्ट, मन्थली ॲब्स्ट्रॅक्ट ऑफ स्टॅटेस्टिक्स् बुइकली, बुलेटिन ऑफ स्टॅटेस्टिक्स् व ए गाइड टु करन्ट ऑफिशियल स्टॅटेस्टिक्स यांसुद्धां अनेक प्रकाशनें करिते.

### निरनिराळ्या खात्यांचे आंकडेवारीचे विभाग

त्याशिवाय भारत सरकारच्या निरनिराळ्या खात्यांनीं आपणांस लागणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या आंकडेवारीकरितां निरनिराळ्या आंकडेवारी संघटना स्थापन केल्या आहेत. अशा संघटनांत अन्न व शेतकी, व्यापार व उद्योग, अर्थ, मजूर, शिक्षण, आरोग्य, गृह, वाहतूक, नैसर्गिक साधनसंपत्ति व शास्त्रीय संशोधन, बांधकाम–उत्पादन व पुरवठा, संरक्षण आणि रेल्वे, इत्यादि खात्यांच्या संघटनांचा समावेश होतो.

त्याचप्रमाणें भारत सरकारनें राष्ट्रीय उत्पन्नाची चौकशी, राष्ट्रीय नमुन्यांची पाहाणी व भारतानें विशेष प्रगति केलेल्या या विषयावरील शास्त्रांच्या पद्धतींचा उपयोग यांसुद्धां विशिष्ट प्रकारच्या आंकडेवारीचें कामहि हातीं घेतलें आहे. यांतील राष्ट्रीय उत्पन्नाच्या चौकशीवरील पहिला अहवाल या वर्षीच्या मे महिन्यांत प्रसिद्ध झाला होता. राष्ट्रीय नमुने पाहाणीचें कार्य देशांतील १८०० खेड्यांतून झालें आहे.

### राज्यांतील आंकडेवारी विभाग

निरनिराळ्या राज्यांतहि अशाच प्रकारच्या संस्था काम करीत आहेत. परंतु मध्यवर्ती सरकारच्या अशा संस्थांच्या मानानें त्यांची प्रगति अगदीं अलीकडील आहे. सध्यां 'अ' आणि 'ब' विभागीय बहुतेक राज्यांत आंकडेवारी विभाग स्वतंत्र यंत्रणा म्हणून किंवा अर्थ व आंकडेवारी विभाग म्हणून अस्तित्वांत आहेत. परंतु बहुतेक 'क' विभागीय राज्यांत मात्र या संस्था अजून स्थापन व्हावयाच्या आहेत.

मध्यवर्ती सरकारतर्फे अधूनमधून होणाऱ्या आंतरराज्य परिषदांमुळें निरनिराळ्या राज्यांत चालू असलेल्या आंकडेवारीच्या कामांत एकसूत्रीपणा राखला जातो.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सारस्वत कॉलनी, सोमवार पेठ, पुणें.
बचतीच्या विविध योजना
हेड ऑफिस–गिरगांव, मुंबई.

निरनिराळ्या खात्यांकडून गोळा होणाऱ्या हवामान, लागवडीखालील क्षेत्र, धान्योत्पादन, निरनिराळ्या पिकांच्या किंमती, गुरांची आंकडेवारी, औद्योगिक आंकडेवारी विषयक कायदा, उत्पादक धंद्याचा मोजणीचा कायदा, कामगार नुकसानभरपाईचा कायदा, व कामगार विषयक इतर कायदे यांच्या कामकाजासंबंधींची महत्त्वपूर्ण आंकडेवारी, यांकरितां सूचना पाठविणें आणि तक्ते तयार करणें हीं राज्यांच्या आंकडेवारी विभागांची मुख्य कामें आहेत. इतर खात्यांना आंकडेवारीसाठी सर्व प्रकारचें तांत्रिक साह्य देणें, निरनिराळ्या खात्यांतर्फे गोळा करण्यांत येणाऱ्या प्राथमिक आंकडेवारीसाठी सुधारलेल्या पद्धतींची शिफारस करणें, व राज्याच्या आर्थिक व सामाजिक जीवनासंबंधीं होणाऱ्या विशिष्ट चौकशीचें काम वेळोवेळीं हातीं घेणें, याहि गोष्टी या विभागांच्या कार्यक्षेत्रांत येतात.

### निवडणुकींतील कमाल खर्च

प्रत्येक उमेदवारानें आपल्या निवडणूक-खर्चाचें पत्रक निवडणुकीचा निकाल सरकारी गॅझेटांत जाहीर झाल्यापासून ४५ दिवसांचे आंत दिलें पाहिजे. संसदेच्या बाबतींत एका जागेकरितां कमाल खर्च २५,००० रु. व दोन जागांसाठीं ३५,००० रु. अशा मर्यादा आहेत. विधान-सभेसाठी वेगवेगळ्या राज्यांना निरनिराळे आकडे ठरविण्यांत आले आहेत. मराठी भाषा ज्या राज्यांत बोलली जाते, तेथील विधानसभेच्या निवडणुकींतिल खर्चाची कमाल मर्यादा खालीं दिली आहे:—

| राज्य | एक जागा | दोन जागा | तीन जागा |
|---|---|---|---|
| मुंबई | ७,००० | १२,००० | १६,००० |
| मध्यप्रदेश, हैद्राबाद | ६,००० | १२,००० | —— |
| मध्यभारत | ५,००० | १०,००० | —— |

मुंबई विधानपरिषदेकरितां २,००० रुपयांची कमाल मर्यादा आहे. ह्यापेक्षां ज्यास्त खर्च उमेदवारानें केला असें आढळून आलें तर त्याची निवडणूक रद्द होईल.

('निवडणूक कायदे व कानू'वरून)

**अभ्रकासाठी किमान किंमत**—जयपूर येथें अभ्रक सल्लागार कमिटीची बैठक नुकतीच भरली होती. ह्या बैठकींत अभ्रकाची किमान किंमत ठरविण्याविषयीं चर्चा करण्यांत आली असें समजतें. हिंदी अभ्रकाच्या धंद्याच्या सुरक्षिततेसाठी अशा किंमतींची मागणी करण्यांत येत आहे.

**शेतकऱ्यांचा सन्मान**—पूर्व जर्मनींतील ५०० शेतकऱ्यांना त्यांनीं केलेल्या कामगिरीबद्दल एक पदक, एक पदवी आणि १,००० इस्ट–मार्कस् (सुमारे २० पौंड) देण्यांत येणार आहेत. पूर्व जर्मनींतील शेतीच्या व्यवसायांत लोकशाही रुजविण्याचें कार्य केलेल्यांना हें प्रोत्साहन देण्यांत येणार आहे. पदवीचें नांव 'मास्टर फार्मर' असें आहे.

## हिंदी चित्रपटांचा धंदा

### श्री. मोदी ह्यांचा आढावा

इंडियन मोशन पिक्चर प्रोड्यूसर्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. के. एम्. मोदी ह्यांचें लंडन येथें ता. ७ जून १९५१ रोजीं भारतीय सिनेमाच्या धंद्याविषयीं भाषण झालें. ब्रिटनच्या रॉयल सोसायटी ऑफ आर्टसतर्फे हा प्रसंग घडवून आणण्यांत आला होता. अध्यक्षस्थान असोसिएटेड ब्रिटिश पिक्चर कॉर्पोरेशनचे अध्यक्ष, सर फिलिप वॉल्टर ह्यांनीं स्वीकारलें होतें.

श्री. मोदी आपल्या भाषणांत म्हणाले कीं, भारतामधील सिनेमाच्या धंद्याला आतां ३८ वर्षे पुरीं झालीं आहेत. पहिला भारतीय चित्रपट श्री. डी. जी. फाळके ह्यांनीं १९१२ मध्यें काढला. त्याचें नांव 'राजा हरिश्चंद्र' असें होतें. तेव्हांपासून आतांपर्यंत भारतांत १,००० च्या वर चित्रपट आणि ३,५०० बोलपट काढण्यांत आले. आतां हा धंदा म्हणजे बहुजन समाजाच्या करमणुकीचें एक मोठें साधन झालें असून उद्योगधंद्यांत त्याचें स्थान महत्त्वाचें आहे. ह्या धंद्यांत सुमारें ४० कोटी रुपयांचें भांडवल गुंतविलें गेलें आहे. १ लाख स्त्री-पुरुष आपली उपजीविका ह्या धंद्यांत करीत आहेत. बोलपटांचें उत्पन्न दरवर्षी २४ कोटी रुपयांच्या आसपास होतें. करमणुकीवरील कराच्या निमित्तानें ६ कोटी रुपये आणि इतर करांच्या रूपानें आणखी ९ कोटी रुपये सरकारला द्यावे लागतात. ह्या धंद्याकडे सरकारनें फारसें लक्ष दिलें नाहीं ही गोष्ट खरी आहे. १९१८ सालीं इंडियन सिनेमॅटोग्रॅफ ॲक्ट मंजूर करण्यांत आला. १९२७ सालीं एक चौकशी कमिटी नेमण्यांत आली. तिच्या शिफारसी मात्र अंमलांत आणल्या गेल्या नाहींत. १९३१ सालीं पहिला एतद्देशीय भाषेंतील बोलपट निघाला. तेव्हांपासून भारतीय बोलपटाचा धंदा परदेशी बोलपटापेक्षां अधिक महत्त्वाचा ठरूं लागला. धंद्याची व बोलपटांची वाढ झपाट्यानें होऊं लागली. १९३१ ते १९४० ह्या कालावधींत भारतामधील कांहीं प्रमुख बोलपटांची निर्मिति झाली आणि बोलपटगृहांच्या संख्येंतही बरीच भर पडली. ह्याचा अर्थ धंद्याची आर्थिक स्थिति समाधानकारक होती, असा मात्र नव्हे.

दुसऱ्या महायुद्धाच्या कालांत ह्या धंद्याला एकदम तेजी आली. युद्धामुळें ज्यांना खूप नफा मिळाला असे लोक ह्या धंद्यांत पडूं लागले. बोलपटांचें उत्पादन मात्र कमी होऊं लागलें; कारण धंद्याला लागणाऱ्या साहित्याची चणचण भासूं लागली. युद्धानंतर अधिक बोलपटांचें उत्पादन होऊं लागलें. परंतु ते दाखविण्यासाठी प्रेक्षकगृहें मात्र कमी पडूं लागलीं. सरकारनें नवीं बोलपटगृहें बांधण्यावर जवळ जवळ बंदीच घातली. त्यामुळें बोलपट तयार करूनहि ते दाखविणें दुरापास्त होऊं लागलें. युद्धकाळीं ह्या धंद्यांत शिरलेल्या लोकांमुळें व्यवसायाच्या आर्थिक स्थिरतेला कांहीं फायदा झाला नाहीं. उलट मजुरांचीं भांडणें, वाढता उत्पादनाचा खर्च व सरकारी नियंत्रणं ह्यांमुळें धंद्यांत अस्थिरता उत्पन्न झाली. प्रांतिक सरकारांनीं आपलें उत्पन्न वाढविण्यासाठी करमणुकीवरील करांत व इतर करांत खूपच वाढ केली. स्वतंत्र भारताच्या सरकारनें ह्या धंद्याचा विकास करण्याचें महत्त्व ओळखलें आणि ह्याच खटपटी करण्यांत आल्यावर १९४९ सालीं फिल्म्स एनक्वायरी कमिटी नेमली.

इतर देशांप्रमाणें भारतामधील सिनेमाचा धंदाहि तीन भागांत वाटला गेला आहे. ते असे: (१) बोलपटांचे निर्माते, (२) बोलपटांचे वितरण करणारे, आणि (३) ते दाखविणारे. ह्या तिन्ही गोष्टी स्वतःच करणाऱ्या फारच थोड्या संस्था भारतांत आहेत. म्हणून मीहि प्रत्येक भागाची वेगळीच माहिती देण्याचा प्रयत्न करतों.

प्रथम निर्मितिशाखा: भारताला बोलपटासाठी लागणारी कच्ची फिल्म परदेशाकडून आयात करावी लागते. दरवर्षी सुमारें ७५ लाख रुपयांची कच्ची फिल्म लागते. तिची पौंडांत किंमत सुमारें ६,००,००० पौंड होते. फिल्मची एकूण लांबी १७·५ कोटी फूट होते. त्याशिवाय ध्वनिलेखनासाठीं सालीना ३६ लाख रुपयांची (३ लाख पौंडांची) यंत्रसामुग्री आयात करावी लागते आणि ४१ लाख रुपयांचे प्रोजेक्टर्स व इतर माल आणावा लागतो. ह्यावरून सिनेमाच्या धंद्याची यंत्रसामुग्री भारतांतच तयार करणें किती आवश्यक आहे तें दिसून येईल. भारतांत ध्वनिलेखनाची व इतर सोय असलेले असे ६० स्टुडिओज आहेत. सर्वांत मिळून १४० ध्वनिलेखनाच्या रंगभूमी आहेत. बोलपटाचें संस्करण करणाऱ्या ३८ प्रयोगशाळा आहेत. २३ स्टुडिओज मुंबईत, १४ कलकत्त्यांत आणि १२ मद्रासला आहेत. प्रत्येक स्टुडिओंतून दरवर्षी सरासरी ४ बोलपट बाहेर पडतात. रंगीत चित्रपट काढण्याची सोय नसल्यामुळें सर्व भारतीय बोलपट काळ्या-पांढऱ्यांतच निघतात. स्टुडिओजचे मालक धरून भारतांत सुमारें ३०० बोलपट-उत्पादक आहेत. निर्मात्यांची गर्दी मुंबईत अधिक आहे. एकूण बोलपटांच्या ६० टक्के बोलपट मुंबईत तयार होतात. बहुतेक उत्पादकांना रकमा कर्जाऊ काढून धंदा करावा लागतो; त्यासाठीं वेगळ्या संस्था नाहींत आणि बँकांचीं दारेंहि कर्जासाठीं खुलीं असत नाहींत. अर्थात, सावकाराकडे अगर वितरकाकडे कर्जासाठीं धांव घ्यावी लागते. रक्कम कर्जाऊ देणारे धंदेवाले व्याज जबर घेतात आणि कधीं कधीं उत्पादनावरहि ताबा चालवितात. कर्जाऊ रक्कम उभारण्याच्या ह्या पद्धतीमुळें धंद्यांत फार अडचणी उत्पन्न झाल्या आहेत. धनको कांहीं विशिष्ट नट-नटींनींच बोलपटांत कामें केलीं पाहिजेत असा आग्रह धरतो. त्यामुळें कांहीं नटींचा भाव भलताच वाढतो. एकाच वेळीं दोन किंवा अधिक बोलपटांत कामें करण्याची प्रथाहि ह्याचमुळें पडली. ब्रिटिश फिनॅन्स कॉर्पोरेशनसारखी एखादी संस्था कर्ज देण्यासाठीं उभी करावी असा ह्या धंद्यांतील लोकांचा आग्रह आहे. अशा प्रकारची कांहीं शिफारस पाटील चौकशी-कमिटीनें केली आहे.

भारतांत बोलपटांचें वितरण करण्याची पद्धत सामान्यतः पुढीलप्रमाणें आहे:-(१) उत्पादकाकडून तयार फिल्मचे हक्क कायमचे अगर कांहीं काळापुरते एकदम विकत घेणें, (२) बोलपटांचें वितरण कमिशन घेऊन करणें; कमिशन १० ते २० टक्क्यांच्या दरम्यान असतें, (३) बोलपट तयार होण्याच्या अगोदर रक्कम आगाऊ देणें व सर्व हक्क आपणाकडे मिळविणें. ह्या पद्धतींत बोलपट दाखविण्यांत येऊं लागल्यावर कमिशनहि घेण्यांत येतें आणि (४) बोलपटाचे सर्व हक्क आपणाकडे घेऊन उत्पादकाला किमान रकमेची हमी कमिशन पद्धतीनें देणें.

भारतांत एकूण ३,००० सिनेमागृहें आहेत; त्यांपैकी ८०० फिरतीं आणि तात्पुरत्या स्वरूपाचीं आहेत. दर दहा लाख लोकवस्तीमागें ८ सिनेमागृहें असें प्रमाण भारतांत पडतें. इतर देशांशीं तुलना करतां हें प्रमाण अत्यल्प आहे हें उघडच आहे. बहुतेक सिनेमागृहें खाजगी मालकीचीं अगर कंपन्यांच्या मालकीचीं आहेत. फक्त दोन सिनेमागृहें परकीय मालकीचीं आहेत. सिनेमागृहांत एकूण २५ कोटी रुपयांचें (२,००,००,००० पौंडांचें) भांडवल गुंतलेलें आहे. सिनेमागृहांच्या सुमारें ३० साखळ्या आहेत. त्या सर्वांत मिळून सुमारें २०० बोलपटगृहांचा

अंतर्भाव होतो. सर्वांत मोठी सांखळी वेस्टर्न इंडिआ थिएटर्स लि. ही आहे. ह्या कंपनीचीं स्वतःचीं ३० सिनेमागृहें आहेत. त्याशिवाय एक वितरण—संस्था आणि १ स्टुडिओहि त्या कंपनीच्या मालकीचा आहे. बोलपटगृहांत सरासरी ६८० प्रेक्षकांची बसण्याची सोय असते. द. भारतामधील कांहीं प्रेक्षकगृहांतून ९०० प्रेक्षकांचीहि सोय कधीं कधीं केलेली आढळते. भारतांत रोज सुमारें २० लाख लोक सिनेमाला जात असावेत असा अंदाज आहे. तिकिटांचे दर २ ते ३ आण्यांपासून ३ रुपयांपर्यंत असतात. अगदीं खालचे दर सोडल्यास इतर दरांच्या तिकिटांवर राज्य—सरकारें करमणुकीवरील कर आकारतात. कराची आकारणी तिकिटांच्या दरांच्या १२॥ टक्के ते ७५ टक्के ह्यांच्या दरम्यान कितीहि असते. भारतीय बोलपटांची लांबी सामान्यपणें ११,००० ते १५,००० फूट असते आणि ते बहुतेक मनोरंजक असतात.

**प्रेतें जाळण्यासाठीं विजेचा उपयोग**—मुंबई नगरपालिकेनें प्रेतांचें दहन करण्यासाठीं विजेवर चालणाऱ्या दोन मोठ्या भट्ट्या चंदनवाडी येथें बांधण्याचें ठरविलें आहे. भट्ट्यांची यंत्रसामुग्री डेन्मार्ककडून मागविण्यांत आली असून तिची किंमत २,३६,७०० रुपये आहे. मुंबईंत दहनविधीसाठीं लाकडें मिळणें कठीण होऊं लागल्यामुळें वरील सोय करण्यांत येणार आहे. भारतांत अशा प्रकारच्या ह्या पहिल्याच भट्ट्या होतील.

**THE BRIHAN-MAHARASHTRA SUGAR SYNDICATE LIMITED.**

Head Office-Commonwealth Building,
980 Sadashiv, Laxmi Road, Poona 2.

# NOTICE

The Seventeenth Annual General Meeting of the Share-holders of the Brihan-Maharashtra Sugar Syndicate Ltd., Poona 2, will be held on Sunday, the 30th December 1951, at 3 P. M. at the Tilak Smarak Mandir, Poona 2, to transact the following business:—

(1) To receive and adopt the Directors' Report and Audited Statements of Accounts for the year ended 30th September 1951.

(2) To sanction the payment of Dividend for the above-mentioned period.

(3) To elect Directors in place of those who retire by rotation but are eligible for re-election.

(4) To appoint Auditors for the current year and fix their remuneration.

By Order of the Board of Directors,

Poona 2.
9th December, 1951.

C. G. Agashe & Co.,
Managing Agents.

*Note*:—The Transfer Books of the Company will be closed from 16th December 1951 to 7th January 1952 (both days inclusive).

The Dividend when declared will be made payable at the Bank of Maharashtra Ltd., Poona 2, on and after the 7th February, 1952.


**ठेवी स्वीकारण्यांत येतात**

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वीं आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव-रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay.

**भोर स्टेट बँक लि.**

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.**

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले.
श्री. चं. रा. राठा.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी.
श्री. बा. ग. घंदुके.

सरकारी रोखे खरेदी—विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१—६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.



## उत्तर प्रदेशांतील सहकारी संस्थांचा व्याप

उत्तर प्रदेशांतील सहकारी संस्थांच्या वाढीसंबंधीं पुढील माहिती मिळते. १९४६ च्या मानानें राज्यांतील सहकारी संस्थांच्या संख्येंत ८० टक्के वाढ झाली आहे. सध्या सहकारी संस्थांची संख्या ३०,००० आहे. सभासदांची संख्या ३० लाखावर आहे आणि खेळतें भांडवल १८ कोटी रुपयांपेक्षां अधिक आहे. प्रांतांतील सहकारी चळवळीच्या इतिहासांत एक काळ असा होता कीं त्यावेळीं पतपेढ्यांची संख्या अधिक असे परंतु आतां उत्पादक सहकारी संस्थांची संख्या अधिक होऊं लागली आहे. त्यांतही शेतीचें उत्पादन करणाऱ्या संस्थांचें प्रमाण अधिक आहे. प्रत्येक कुटुंबांत ५ माणसें धरलीं तर असा हिशोब बसतो कीं, राज्यांतील एकशष्ठांश लोकसंख्या आज सहकारी चळवळीच्या कक्षेंत आली आहे किंवा चळवळीशीं संबंधित अशी आहे. कर्जें उभारणें आणि देणें एवढींच कामें करून ह्या संस्था थांबलेल्या नाहींत. त्याशिवाय सामाजिक सेवा करणाऱ्या अनेक बहुविध सहकारी संस्थाहि आहेत. सहकारी संस्थांचें एक मोठें जाळेंच राज्य-सरकारच्या हाताशीं आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. लोकांच्या आर्थिक-जीवनाची घडण बनविण्यासाठी त्यांचा चांगला उपयोग होऊं शकेल. ग्रामीण भागांत विविध कार्यकारी सहकारी संस्था बऱ्याच प्रमाणावर निघाल्या आहेत. १९४६ सालीं अशा संस्थांची संख्या ६,००० होती; ती आतां २२००० झाली आहे. शेतकऱ्यांना बीं-बियाणें वाटण्याचें काम तर त्या करतातच, पण त्याशिवाय नियंत्रित वस्तूंचें वांटपहि करतात. दर महिना सुमारें ५० लाख रुपये किंमतीच्या ग्राहकांच्या रोजच्या गरजा भागविणाऱ्या वस्तूंची उलाढालहि त्यांच्याकडून होते. खत तयार करणें, झाडें लावणें व इतर शेतीची संबंधित कामें करण्यांतहि त्यांचा हात आहे. शेतजमिनीचे विखुरलेले तुकडे एकत्र करण्याचें काम करणाऱ्या कांहीं संस्था आहेत. त्यांनीं आतापर्यंत २ लाख एकर जमीन सलग केली आहे.

झांशी जिल्ह्यांत दोन गांवीं सहकारी शेतीचा प्रयोग यशस्वीपणें करण्यांत आला आहे. आतां आणखी १० जिल्ह्यांत असेच प्रयोग करण्यांत येणार आहेत. 'ट्यूब' विहिरींच्या पाण्याचें वाटप करण्यांतहि सहकारी संस्था यशस्वी झाल्या आहेत. उसाबाबतच्या सहकारी शेतीसंस्थांनीं उपयुक्त कार्य केलें आहे. प्रांतांतील साखर कारखान्यांना जितका ऊंस पुरविला जातो त्यापैकीं ८० ते ९० टक्के ऊंस वरील संस्थांच्या युनिअन्सकडून पुरविला जातो. त्याशिवाय विहिरी खणणें, लहानसहान पूल बांधणें, रस्त्यांची दुरुस्ती करणें, हींहि कामें ह्या संस्था करतात. मोठ्या प्रमाणावर धंदा करण्यासाठीं यू. पी. को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट अँड मार्केटिंग फेडरेशन नांवाची संस्था आहे. ही राज्यांतील सर्वांत प्रमुख सहकारी संस्था आहे. राज्यांतील ३० जिल्ह्यांसाठी कापडाची आयात ह्याच संस्थेमार्फत होते. ह्या संस्थेचा व्याप व ताकद हीं ज्या प्रमाणांत वाढतील त्या प्रमाणांत अधिक जबाबदारीचीं कामें ती अंगावर घेईल अशी अपेक्षा आहे. शेतीचीं अवजारें तयार करण्याचे कारखाने काढणें, प्रांताप्रांतांच्या दरम्यान होणारी वस्तूंची देवघेव करणें, इत्यादि कामें ही संस्था करूं लागेल. खेडेगांवांतून असलेल्या उत्पादकांच्या सहकारी संस्था आणि शहरांतून असणाऱ्या ग्राहकांच्या संस्था ह्यांच्यामधील एक महत्त्वाचा दुवा म्हणून संस्था उपयुक्त काम करूं शकेल.

## भागीदारांना कोणती माहिती हवी असते?

### अमेरिकन कंपनीचा उपक्रम

भागीदारांना, त्यांचे ज्या कंपन्यांत शेअर्स असतात, त्या कंपन्यांचे बाबत कोणती माहिती हवी असते? भागीदार नेहमीं कोणते प्रश्न विचारतात? वेस्टर्न युनियन टेलिग्राफ कं. नें १९३९ सालापासून आपल्या भागीदारांची जिज्ञासा पुरी करण्याचा प्रयत्न चालविला आहे व त्यांना हवी ती माहिती पुरविण्यासाठी ती कंपनी तत्पर असे. भागीदारांनीं आजवर विचारलेल्या हजारों प्रश्नांची छाननी करून, त्यांतील सर्वांत अधिक वेळा विचारलेले प्रश्न निवडून काढले आहेत. त्यांवरून भागीदारांच्या डोक्यांत घोळत असलेल्या विचारांची पूर्ण कल्पना येईल.

(१) डिव्हिडंड व नफा—आपली गुंतवणूक सुरक्षित असावी आणि तिचेवर योग्य व्याज सुटावें, अशी भागीदारांची सर्वांत महत्त्वाची इच्छा असते. कंपनीनें ह्याबाबत सर्व माहिती आपल्या प्रतिनिधींना देऊन ठेवली असल्याकारणानें, भागीदारांच्या प्रश्नांस त्यांना बिनचुक व तात्काळ उत्तरें देतां येतात.

(२) व्यवस्था—व्यवस्थापकांच्या लायकीबद्दल व त्यांच्या धोरणाविषयक मतांबद्दल भागीदारांस तपशीलवार माहिती हवी असते. व्यवस्थापकांनीं खरोखरच चांगलें काम केलें असेल, तर त्याची स्तुति भरपूर ऐकूं येते. गेलीं कांहीं वर्षे वेस्टर्न युनियनला वाईट गेलीं, तेव्हां कंपनीनें यांत्रिकीकरणाची व यंत्रें नवीं घालण्याची योजना आखली. तिला ९८% भागीदारांनीं हार्दिक पाठिंबा दिला.

(३) भागांची खरेदी-विक्री—भागांच्या चालू किंमतीबद्दल नेहेमीं विचारणा केली जाते, आणि शेअर विकू का, खरेदी करू का, असे प्रश्न विचारण्यांत येतात. कंपनीचे प्रतिनिधी अशा प्रश्नांचीं उत्तरें देण्याचें युक्तीनें टाळतात. त्यांचें काम फक्त माहिती पुरविण्याचें असतें.

(४) चालू आर्थिक परिस्थिति—चालू आर्थिक घडामोडी, सरकारी बंधनें, कर, युद्धाचा संभव, वाढती महागाई, स्पर्धा, ह्या सर्वांचा कंपनीच्या मिळकतीवर परिणाम आणि त्यामुळें नफ्यांत होणारा फरक, ह्याबद्दल कित्येक भागीदार विचारणा करतात.

(५) कंपनीचा वार्षिक अहवाल—भागीदारांचें कंपन्यांच्या वार्षिक अहवालांकडे फारसें लक्ष नसतें अशी समजूत वेस्टर्न युनियनच्या बाबतींत तरी चुकीची आहे. कंपनीच्या रिपोर्टांत भरपूर चित्रें असतात आणि सर्व माहिती सोप्या व साध्या शब्दांत दिलेली असते.

(६) कामगार संबंध—मालक-कामगार संबंध चांगले असावेत, ह्याकडे अधिकाधिक भागीदारांचा कल असतो; परंतु मजुरींत वाढ, कामगारांच्या सुखसोयी, इत्यादींचा कंपनीच्या नफ्यावर परिणाम होऊं नये, ह्याविषयीं त्यांची विचारणा असते.

(७) कंपनीच्या प्रतिनिधीनें भागीदारांची वारंवार भेट घेण्याची पद्धत त्यांना आवडली आहे. त्यामुळें त्यांना रिपोर्टांतून न कळणारी अशी कितीतरी माहिती विचारून घेतां येते.

---

अमेरिकेंतील पाळीव कुत्रे—अमेरिकेमधील पाळलेल्या कुत्र्यांची संख्या सुमारें २,२०,००,००० इतकी असावी असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या कुत्र्यांसाठीं त्यांचे मालक दरवर्षी १७ कोटी, ८० लाख पौंड खर्च करतात.

# दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,५६,००० |

—यथावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B., मॅनेजर

# बँक ऑफ पूना, लिमिटेड.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

— संचालक मंडळ —

१ श्री. मुरलीधर चतुरभुज लोया, ( चेअरमन )
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी., व्हा. चेअरमन
३ डॉ. ना. भि. परुळेकर, संचालक 'सकाळ'
४ श्री. फ्रामजी पेस्तनजी पोचा, सॉडस् मर्चंट
५ श्री. लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी, बँकर्स व मर्चंट सोलापूर
६ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी, व्यापारी
७ श्री. गणपतराव काळूराम नाईक, बी. एस्सी., बी. ई., एल्एल्. बी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याची सोय.

ठेवींवर व्याज—

चालू खातें अर्धा टक्का, सेव्हिंग्ज १॥ टक्के, मुदत ठेव १ वर्ष २॥ टक्के, ३ वर्षे ३ टक्के.

शाखा स्थानिक—(१) भवानी पेठ, व (२) सदाशिव पेठ, पुणें.

बाहेरगांवीं—सोलापूर, सांगली.

मुख्य ऑफिसः—४५५ रविवार पेठ, पुणें नं. २

गो. गं. साठे, मॅनेजर.

# पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.

४११ शनवार पेठ, पुणें २.

तारेचा पत्ताः—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३११५

( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था )

संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिश्रण यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

संस्थेच्या अडत दुकानाचा पत्ता व टेलिफोन नं. ३२०५. } ११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

( मिरज येथें १९१९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

# दि मिरज स्टेट बँक लि.

—मिरज—

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९१९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )

★ कुर्डुवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन.

के. डी. शिराळकर, मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.